देशोन्नती

## तालुका अपडेट

# भित्तीपत्रके ही विद्यार्थ्यांची कलात्मकता

## डॉ.राजेशम वेलुपुल्ला यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन

**समुद्रपूर** : भितीपत्रके विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे क्लात्मक माध्यम आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलात्मक गुणांना वाव मिळतो आणि भविष्यात विद्यार्थी लिखाण करायला लागतो, स्वतःच्या आत दडलेला विचार तो भितीपत्रकाच्या माध्यमातून लिहीत असतो म्हणून विद्यार्थी मित्रांनो, महाविद्यालयीन जीवनामध्ये भितीपत्रके ही विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देण्यासाठी खूप महत्त्वाचे आहेत. या अशा लिखाणातून भविष्यात एक मोठा लेखक घडू शकतो म्हणून भितीपत्रके ही विद्यार्थ्यांची कलात्मकता आहे ,असे प्रतिपादन डॉ. राजेशम वेलुपुल्ला यांनी केले. स्थानिक विद्या विकास महाविद्यालयात मराठी भाषा पंधरवडा दिनानिमित्त मराठी विभागातर्फे भित्तिपत्रकाचे उद्घाटन



करण्यात आले.त्यावेळेस ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी इंग्रजी साहित्याचे अभ्यासक इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.राजेशम वेलुपुल्ला होते. प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभाग प्रमुख डॉ. मिलिंद कांबळे, प्रा.मनोज बावणे, प्रा.किशोर घाटुर्ले, प्रा.स्मिता काळे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. मिलिंद कांबळे यांनी केले. मराठी भाषा पंधरवडा दिनानिमित्त त्यांनी या दिनाचे महत्त्व सांगितले. तसेच त्यांनी भित्तीपत्रके विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेसाठी कसे महत्त्वाचे आहे या संदर्भात विवेचन केले. तसेच प्रा. मनोज बावणे यांनी विद्यार्थ्यांना भित्तीपत्रकाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. किशोर घाटुर्ले यांनी केले तर आभार स्मिता काळे यांनी मानले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी सहकार्य केले. तालुका प्रतिनिधी

Wardha Edition
Jan 19, 2025 Page No. 7
Powered by: erelego.com

SCAN AnyScanner